



दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १५० ●शनिवार, दि. ३० ऑगस्ट २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# खाऊ गल्ली, हॉटेल बंद, पाण्याचीही सोय नाही...





## सरकार म्हणजे इंग्रजांपेक्षा बेकार आहे; जरांगेंची महायुतीवर सडकून टीका

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत आझाद मैदानात आमरण उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या आंदोलनाला आझाद मैदान पोलिसांनी एक दिवसाची मुदतवाढही दिली आहे. यानंतर मनोज जरांगे यांनी उपोषण स्थळावरून माध्यमांशी संवाद साधला.

मराठा आंदोलकांना अन्न पाणी मिळू नये म्हणून खाऊ गल्ली बंद केल्या. तसेच स्वच्छतागृहेही मिळू नयेत अशी व्यवस्था केली आहे, असा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला. हे सरकार म्हणजे इंग्रजांपेक्षा बेकार आहे. मराठ्यांच्या मुलांना वाईट वागणूक मिळत आहे, अशी सडकून टीकाही जरांगे यांनी महायुती सरकारवर केली.



### ●फडणवीसांनी धनगरांना फसवलं

**फडणवीसांनी धनगरांना फसवलं आणि अजून आरक्षण दिलं नाही. कैकाडी समाज हा पश्चिम महाराष्ट्रात अनुसूचित जातीत आहे, मराठवाड्यात ओबीसी आहे. तर इतर ठिकाणी वेगळ्याच प्रवर्गात आहे. कैकाडी समाज एकाच राज्यात तीन प्रवर्गात आहे हे फडणवीसांचं कर्तृत्व. मराठ्याची एक मुलगी ओबीसी आणि दुसरी जनरल प्रवर्गात, हे तुमचं कर्तृत्व. शेतकरी आत्महत्या करतात हे फडणवीसांचा कर्तृत्व, अशी खरमरीत टीकाही मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर केली.**

आम्ही आरक्षणासाठी आंदोलन करतोय. पण या ठिकाणची खाऊ गल्ली, हॉटेल बंद करण्यात आले आहेत. पाण्याची सोय करण्यात आली नाही. आंदोलकांना चहा-पाणी, जेवण मिळू नये म्हणून हे सगळे करण्यात आले. त्यांना स्वच्छतागृहे मिळू नयेत यासाठी प्रयत्न केले. आम्ही सरकारशी सहकार्य केलं, त्यांच्या नियमांचे पालन केले. पण हे सरकार इंग्रजांपेक्षा बेकार आहे. सरकारने आडमुठेपणा केला तर आम्हीही आडमुठेपणा करणार, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. आम्ही कधीच असं म्हटलं नाही की, ओबीसींचे काढून घ्या आणि आम्हाला द्या. ▶▶ उर्वरित पान २ वर

# मुंबईत भरपावसात मराठा बांधवाने अंगावर ओतून घेतले डिझेल

## मंत्रालय, CSMT, चर्चगेट स्थानकात मोठी गर्दी



**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईतल्या मुसळधार पावसाचा फटका आझाद मैदानालाही बसलाय. मैदानावर मोठ्या प्रमाणावर पाणी साचलंय, चिखल झाला आहे. मात्र या सगळ्या अडचणींवर मात करत मराठा आंदोलकांचा उत्साह अजूनही कायम आहे.

मराठा आंदोलकांनी सीएसएमटीनंतर आता चर्चगेट स्टेशन काबीज करण्यास सुरुवात केली आहे. मुंबईतील जोरदार पावसाने आंदोलकांना अडचणींचा सामना करावा लागतो आहे. अशात, आडोसा घेण्यासाठी मराठा आंदोलक विविध ठिकाणी आसरा घेताना दिसत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस बाहेर एका मराठा आंदोलकाने ▶▶ उर्वरित पान २ वर

# दबंग तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी उभे राहून शेतरस्ता केला मोकळा

**● बीड तालुक्यातील मौजे इट गांगनाथवाडी शिवरातील गेल्या चाळीस वर्षांपासून रखडलेला शेतरस्ता तहसलदार चंद्रकांत शेळके साहेब यांनी स्वत: उभे राहून मोकळा करत शेतकऱ्याची अडचणी दूर केली.**




**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील ईट येथील दत्तात्रय सखाराम नरनाळे, गोरख माणिकराव नरनाळे यांच्या गट नंबर २५३ मधील शेतात शेती कामासाठी गाडी रस्ता नसल्याने, त्यांना आपल्या शेतातील मशागतीची कामे, शेतातील माल व साहित्य दूरवरून डोक्यावर घेऊन जावे लागत होते, तसेच शेतील कामे करण्यासही अडचणी येत होत्या. शेतकरी दत्तात्रय सखाराम नरनाळे व गोरख नरनाळे यांनी तहसील कार्यालयात धाव घेत व्यथा मांडली. तहसीलदार श्री. चंद्रकांत शेळके मंडळ अधिकारी सौं. वंदना विघणे यांना यांनी स्वतः पंचनामा करून अर्जदार व गैरअर्जदारांना सुनावणीला बोलवून सर्व शेतकऱ्यांचे नुकसान न होता, सर्वे नंबरप्रमाणे रस्ता मोकळा करून देत, शेतरस्त्याचा प्रश्न निकाली काढला. या कार्यवाहीनंतर शेतकरी दत्तात्रय सखाराम नरनाळे, गोरख माणिक नरनाळे यांनी समाधान आभार व्यक्त केले. यावेळी तहसीलदार शेळके साहेब, मंडळ अधिकारी वंदना विघ्ने, तलाठी काकडे साहेब, पोलीस कर्मचारी व संबंधित दोन्ही बाजूंचे शेतकरी भगवान कदम महादेव लबासे पंच आदी गावातील प्रतिष्ठित नागरिक ▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड : दैनिक मराठवाडा पत्र कार्यालयामध्ये श्रींची आरती करताना दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे संपादक अशोक नाना होळकर, तनश्री नरनाळे, आराध्या नरनाळे, सौं. ज्योती दत्तात्रय नरनाळे.*

# जिल्हाधिकारी कार्यालयात शेतकऱ्याने पेट्रोल ओतून घेतले

## डॉ.वायबसे व गुंडांवर कारवाईची मागणी: उपोषण करूनही दखल न घेतल्याने उचलले टोकाचे पाऊल

**बीड । प्रतिनिधी**

भावाने खोटे कागदपत्र तयार करून जमिनीचा फेरफार करून घेतल्याचा आरोप करत भाऊ भावजई व इतर लोकांविरोधात कारवाई होत नसल्याने एका शेतकऱ्यांने आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या खालच्या ग्राउंड परिसरात अंगावर पेट्रोल ओतून घेतल्याने एकच खळबळ उडाली



होती. पोलिसांनी या शेतकऱ्यास ताब्यात घेतले आहे. दरम्यान शेतकऱ्यासमवेत त्याची पत्नी देखिल होती. पत्नीच्या आरडा ओरडन्याने याने जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर हादरून गेला होता. रामहरी महादेव वायबसे (रा. कासारी ता.जि.बीड) यांचे भाऊ संभाजी महादेव वायबसे व भावजई ▶▶ उर्वरित पान २ वर



*आझाद मैदानावर आ. विजयसिंह पंडित यांनी संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी त्यांनी आंदोलनाला पाठिंबा देऊन मराठा आरक्षणासाठी आपण आंदोलनात सहभागी झाल्याचे सांगितले. यावेळी युवानेते पृथ्वीराज पंडित, शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित उपस्थित होते.*

# सावधान! कुठल्याही क्षणी माजलगाव धरणातून पाणी सुटणार

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या चोवीस तासात मोठ्या प्रमाणात पाऊस कोसळत असून माजलगाव धरणही ९० ट३के भरलेले असून आजही धरण क्षेत्रात नदी-नाल्यातून मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक होत आहे. त्यामुळे या धरणातून कोणत्याही क्षणी सिंधफणा नदीपात्रात पाणी सोडण्याची श३यता असून या नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. या गावात मनूर, लुखेगाव, गोविंदपूर, ढेपेगाव, सांडसचिंचोली, नागडगाव, रोशनपुरी या गावच्या लोकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. तलाठी, मंडल अधिकारी, ग्रामसेवक आणि ▶▶ उर्वरित पान २ वर





# गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्था लोकाभिमुख करण्यावर भर

शिक्षण हे समाजाच्या सर्वांगीण विकासाचे आणि राष्ट्राच्या प्रगतीचे मूळ आहे. शिक्षणामुळे केवळ ज्ञानसंपादन होत नाही तर आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक जबाबदारी आणि आर्थिक स्वावलंबनाची वाट खुली होते. म्हणूनच शासनाने 'शिक्षण सर्वांसाठी' हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक घटकातील विद्यार्थ्यांना समान संधी देण्यासाठी राज्य शासनाने विविध योजना आणि सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे शक्तिशाली साधन आहे. आजच्या युगात शिक्षण व्यवस्थेला विद्यार्थ्यांच्या गरजा, स्वप्ने आणि क्षमतांशी जोडणे ही काळाची गरज आहे. या जाणिवेतून शासनाने शिक्षण व्यवस्था लोकाभिमुख करण्यासाठी अनेक ठोस पावले उचलली आहेत. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 अंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, संशोधन वृत्तीला आणि कौशल्यविकासाला चालना देणारे उपक्रम राबवले जात आहेत.

अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांकरिता एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ-राज्य शासनाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. राज्यात २६ फेब्रुवारी २०२४ पासून सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) आरक्षणाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी तसेच शासकीय सेवांमधील सरळसेवेसाठी १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. यानंतर न्यायमूर्ती शिंदे समितीच्या शिफारशीनुसार मराठा समाजातील काही विद्यार्थ्यांना कुणबी, कुणबी-मराठा किंवा मराठा-कुणबी जातीचे म्हणजेच इतर मागास वर्ग (OBC) प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र मिळाले आहे. मात्र, या विद्यार्थ्यांपैकी अनेकांना जात वैधता प्रमाणपत्र तातडीने न मिळाल्याने प्रवेश प्रक्रियेत अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर राज्यशासनाने अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशांकरिता एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सुरुवातीला सहा महिने, त्यानंतर तीन महिन्यांची मुदतवाढ दिली होती. तरी देखील काही विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळवण्यास अडचणी येत आल्याचे निदर्शनास आले आणि अनेक विद्यार्थांनी तक्रारी केल्या होत्या याची राज्य शासनाने दखल घेऊन पुन्हा तीन महिन्यांची अतिरिक्त मुदतवाढ दिली आहे.

याशिवाय, सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठी सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे प्रवेश जातवैधता प्रमाणपत्रांच्या अभावी त्यांचे प्रवेश रद्द होणार नाहीत आणि शैक्षणिक नुकसान टळणार आहे.

सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) आरक्षणाच्या अंमलबजावणीनंतर राज्यातील तंत्रशिक्षण संस्थांमध्ये मराठा


विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रवेश घेतले आहेत.

तंत्रशिक्षणातील प्रवेशांची आकडेवारी (२०२४-२५)

पदवी (Under Graduate) : १७ हजार ७७८, पदव्युत्तर (Post Graduate) : १ हजार ९२७, डिप्लोमा (Diploma) : ७ हजार ३५४ म्हणजेच एकूण २७ हजार ०५९ विद्यार्थी यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये SEBC आरक्षणाअंतर्गत प्रवेश घेतलेला आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना- राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा पात्र ३०० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी देशांतर्गत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. ही योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत 'डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना' या नावाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राबविण्यात येत आहे. यामध्ये मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा आणि कुणबी-जातीच्या विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनाने सुरु केलेली ही योजना विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरत आहे. सन 2022-23 पासून या योजनेद्वारे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक पाठबळ मिळू लागले असून, उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढत असून शिक्षणाचा दर्जा वाढविण्यास मदत होत आहे.

या योजनेअंतर्गत राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जातीतील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. विद्यार्थ्यांना केवळ शुल्क सहाय्यच नव्हे, तर वसतिगृह, पुस्तके, अभ्यास साहित्य, प्रवास भत्ता आदी विविध सुविधा पुरवल्या जातात.यामुळे मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जातीतील गरीब व हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन.आणि आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक जगात उभे करण्यासाठी शैक्षणिक मदत होऊन उच्च व तांत्रिक शिक्षण घेताना होणारा आर्थिक खर्चही कमी होतो त्यामुळे उच्च शिक्षणात विद्यार्थांचे प्रमाण वाढते.

छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (CSMNRF)

मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी लक्षित गटातील पीएच.डी. करणाऱ्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीच्या माध्यमातून विशेष प्रोत्साहन देण्याकरिता सन २०१९ या वर्षापासून छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (CSMNRF) सुरु करण्यात आली आहे. सदर छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती अंतर्गत लक्षित गटातील ३०७८ विद्यार्थ्यांना सारथी संस्थेद्वारे सन २०२३ पर्यंत अधिछात्रवृत्ती मंजूर करण्यात आली आहे.आज रोजी पर्यंत ३९३ विद्यार्थ्यांची PhD पुर्ण झाली असून ११० विद्यार्थ्यांना विविध ठिकाणी नोकरी लागली आहे. या विद्यार्थ्यांपैकी २३ विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधन विषयात पेटंट मिळाला आहे.

विद्यार्थ्यांना देण्यात येणारी विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे (UGC) अधिछात्रवृत्ती : JRF प्रमाणे (प्रथम ०२ वर्ष) एकूण प्रती वर्ष रक्कम अधिछात्रवृत्ती UGC निकषा नुसार ५ लाख ५३ हजार ३००, एकूण प्रती माह अधिछात्रवृत्ती ४६ हजार १०८ आहे.

तसेच SRF प्रमाणे (२ वर्षांनंतर पुढील ०३ वर्ष) एकूण प्रती वर्ष रक्कम अधिछात्रवृत्ती ६ लाख २९ हजार ८००, एकूण प्रती माह अधिछात्रवृत्ती ५२ हजार ४८३ देण्यात येते. अधिछात्रवृत्ती (CSMNJRF) अंतर्गत अंतिमरित्या निवड झालेल्या उमेदवारांना आर्थिक सहाय्य हे सारथीकडून ज्या रोजी अवार्ड लेटर (Award Letter) दिले जाईल, त्या तारखेपासून पुढे पीएच.डी. करिता पाच वर्ष किंवा उमेदवार संशोधनासाठी विद्यापीठ महाविद्यालय/संस्था येथे रुजू झालेला असेल. (विद्यापीठ/महाविद्यालय/संस्थेच्या अहवालातील नमूद रुजू तारीख), या वेळी जी नंतरची तारीख असेल त्या तारखेपासून उमेदवाराच्या फक्त उर्वरित कालावधीसाठी पीएच.डी. च्या फक्त उर्वरित कालावधीसाठी एकुण ५ वर्षांच्या कालावधीच्या आधारे किंवा उमेदवारांनी ज्या तारखेस संशोधन अहवाल (Dissertation) सादर केला असेल, यापैकी जी अगोदरची तारीख असेल त्या तारखेपर्यंत अनुज्ञेय राहील. निवड झालेल्या लाभार्थ्यांना रक्कमे संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे (UGC) अंतर्गत होणाऱ्या बदलानुसार अधिछात्रवृत्ती अनुज्ञेय राहील.

अधिछात्रवृत्ती योजनेअंतर्गत सन २०१९ मध्ये पात्र विद्यार्थी ५०३, पीएचडी घेतलेले विद्यार्थी २४६, नोकरी लागलेले विद्यार्थी ७४ आहेत. सन २०२० मध्ये पात्र विद्यार्थी २०४, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ८०, नोकरी लागलेले विद्यार्थी १८ आहेत. सन २०२१ मध्ये पात्र विद्यार्थी ५५१, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ६४, नोकरी लागलेले विद्यार्थी १० आहेत. सन २०२२ मध्ये पात्र विद्यार्थी ८५१, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ४, नोकरी लागलेली विद्यार्थी १ आहेत. सन २०२३ मध्ये पात्र विद्यार्थी ९६९ आहेत.

परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या जातीच्या विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणासाठी परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये प्रवेश घेता येत नाही. विद्यार्थ्यांची गुणवत्ता असून आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते. मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी जातीतील मुलामुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी परदेशी शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी/पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी QS World Ranking मध्ये 200 च्या आत रँकिंग असलेल्या शैक्षणिक संस्था/विद्यापीठामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश घेतील अशा मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवर्गातील एकत्रितपणे 75 विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सदरची योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत 'सयाजीराव गायकवाड-सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना' या नावाने शैक्षणिक वर्ष 2023-24 पासून राबविण्यात येत आहे.

सारथी संस्थेमार्फत राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या लक्षित गटातील विद्यार्थ्यांकरिता डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती सन 2022-23 पासून 200 शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशित पात्र विद्याध्यर्थ्यांना ही शिष्यवृत्ती लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा पात्र ३०० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी देशांतर्गत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. सदरची योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत "डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना या नावाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राबविण्यात येत आहे.

देशाच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत भारतातील शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक परिवर्तनाची सुरुवात झाली आहे. देशातील एकूण नोंदणी गुणोत्तर (Gross Enrollment Ratio – GER) ५०% पर्यंत नेण्याचे राष्ट्रीय उद्दिष्ट गाठण्यासाठी, भारताने जागतिक दर्जाचे शिक्षण आणि संशोधन भारतातच उपलब्ध करून देण्यासाठी धोरणात्मक पावले उचलली आहेत. महाराष्ट्रातही विविध अभिनव आणि परिवर्तनशील उपक्रम शिक्षण क्षेत्रात राबविले आहेत. यामध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विद्यार्थ्यांपर्यंत संधींची समान उपलब्धता आणि संशोधनाला चालना यावर अधिक भर देऊन गुणवत्तापूर्ण शैक्षणिक बदल करून राज्यातील शिक्षण व्यवस्था लोकाभिमुख केली जात आहे.

– काशीबाई थोरात-धायगुडे
विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -32

◆ पान ९ वरून पुढे...

## खाऊ गल्ली...

आमच्या नोंदी या १५० वर्षांपूर्वीच्या आहेत. हैदराबाद गॅझेट, सातारा गॅझेटमध्ये तशा नोंदी आहेत. त्यामुळे आम्ही कुणाचंही काढून घेत नाही तर, ते आमच्या हक्काचं आहे. उलट आमच्याच हक्काचं काढून घेऊन इतरांना दिलंय. अशा प्रकारचं वक्तव्य करुन सरकारच मराठा आणि ओबीसींमध्ये वाद लावत आहे, असा आरोप जरांगे यांनी केला. ही लढाई आता आरपारची आहे, मागे हटणार नाही. एकतर सरकारला आरक्षण द्यावं लागेल किंवा उपोषण करून मी तरी मरणार. पण मागे हटणार नाही. आता फक्त आरक्षण घेणार नाही तर, त्याची अंमलबजावणी झाल्याशिवाय मी आंदोलन मागे घेणार नाही, असा निर्धार मनोज जरांगे पाटील यांनी केला.

## मुंबईत भरपावसात...

आत्महत्येचा प्रयत्न केला. यावेळी, आंदोलकाने अंगावर डिझेल ओतून घेत स्वत:ला संपवण्याचा प्रयत्न केला. मात्र वेळीच आंदोलनकर्त्यांला थांबवण्यात आल्याने अनर्थ टाळला, मराठा बांधवांनी त्याच्या हातातील डिझेल बाटली घेतली. तर, पोलीसही तात्काळ धावल्याचं दिसून आलं. पावसामुळे आझाद मैदानावर चिखल झाला असून मराठा बांधव आडोसा शोधत आहेत, त्यातून रेल्वे स्थानकावरही ते गर्दी करत आहेत. काही वेळापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवर हलगीच्या तालावर आंदोलनकर्त्यांकडून जल्लोष करण्यात आला होता.

मोठ्या संख्येने मराठा बांधव छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवर एकत्र आले, त्यानंतर सर्वांनी मिळून जल्लोष केला. सेल्फी आणि व्हिडिओ काढत एक मराठा लाख मराठा अशी घोषणाबाजीही केली. आंदोलनस्थळ असलेल्या आझाद मैदानाची क्षमता संपल्यानंतर आंदोलनकर्त्यांची छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवर आणि चर्चेगेट परिसरात मोठी गर्दी केली आहे. दरम्यान, मराठा आंदोलक मंत्रालयाच्या बाहेरही दाखल झाले होते. मंत्रालयाच्या समोरही मोठ्या प्रमाणावर मराठा आंदोलकांची घोषणाबाजी पाहायला मिळाली. मराठा आंदोलकांनी आज मुंबई जाम केली असून अनेक ठिकाणी वाहतूक जाम झाल्याचं चित्र आहे. विशेष म्हणजे पनवेलहून अनेक बांधव लोकल ट्रेनने मुंबईत आले आहेत.

## दबंग तहसीलदार...

उपस्थित होते. मौजे ईट ता.जि. बीड येथीलगंगनाथवाडी शिवार येथील गट नं.२५३ या गटातील ५ एकर जमीनीसाठी आडवलेला रस्ता मंडळ अधिकारी तथा तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी मोकळा करून दिला आहे . येथील शेतकरी तथा संपादक दत्तात्रय नरनाळे यांच्या पाच एकर शेतीकडे जाणाऱ्या रस्त्यावर संबंधित शेतकऱ्याने अतिक्रमण करत शेतीकडे जाणारा गाडी रस्ता अडवला होता. याप्रकरणी नरनाळे यांनी तहसील बीड यांच्याकडे रस्ता मोकळा करण्यासाठी अर्ज दाखल केला होता. या प्रकरणाचा पंचनामा व तपास मंडळ अधिकारी श्रीमती विग्ने यांनी केला सर्व गोष्टीचा अभ्यास करत रस्ता अडवणाऱ्या शेतकऱ्याला समज देण्यात आली मात्र तरीही रस्ता मोकळा करण्यास विरोध करण्यात येत होता. शेताकडे जाण्यासाठी रस्ता नसल्याने दत्तात्रय नरनाळे यांचे शेतमालाचे नुकसान व आर्थिक नुकसानाला सामोरे जाण्याची वेळ आली होती. संबंधित प्रकरणाचा संपूर्ण तपास मंडळाधिकारी तथा तहसीलदार यांनी करत पिंपळनेर पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या साह्याने हा रस्ता मोकळा करून दिला. मौजे ईट ता.जि.बीड येथीलगंगनाथवाडी शिवार येथील गट नं.२५३ या गटातील ५ एकर जमीनीसाठी आडवलेला रस्ता खुला करुन देण्यासाठी अर्जदार दत्तात्रय नरनाळे यांनी तहसीलदार बीड यांच्याकडे अर्ज दाखल केला होता. मागील काही दिवसात या रस्ता बद्दल अधिक तपास व पंचनामा मंडळ अधिकारी तथा तलाठी यांच्या साह्याने पूर्ण करण्यात आला होता. संबंधित शेतकऱ्याकडे दुसरा पर्यायी रस्ता नसल्याने याच रस्त्याचा वापर अधिक सोयीचा होता. परंतु संबंधित शेतकऱ्याने नरनाळे यांच्या शेताकडे जाणारा रस्ता चढवल्याने भविष्यात पीक पाणी व खत तथा इतर शेतीच्या कामासाठी रस्ता नसल्याने नरळे यांना आर्थिक नुकसान सहन करण्याची वेळ आली होती. या प्रकरणाचा संपूर्ण तपास मंडळ अधिकारी श्रीमती विग्ने यांनी केला शेतकऱ्यांची सर्व बाजू ऐकून घेतल्यानंतर परिसरातील शेतकऱ्यांची ही जबाब नोंदणी घेण्यात आली हा रस्ता गेल्या अनेक वर्षापासून गाडी रस्ता म्हणून ओळखला जात होता मात्र संबंधित शेतकऱ्याने रस्ता बंद केल्याने नरनाळे यांना त्रासाला सामोरे जावे लागत होते. संबंधित प्रकरण बीड तहसीलदार यांच्याकडे दाखल करण्यात आले मंडळ अधिकाऱ्यांना यासंबंधी तपास करण्याचा आदेश तहसीलदार यांनी दिला होता या प्रकरणाचा संपूर्ण तपास व पंचनामा करत परिसरातील शेतकऱ्यांची नोंदी व जवाब नोंदवण्यात आला. गेल्या अनेक वर्षापासून हा रस्ता शेतीसाठी वापर केला जात असतानाही संबंधित शेतकऱ्याने जाणून-बुजून हा रस्ता बंद केल्याचे निष्पन्न होतात रस्ता मोकळा करण्यासंदर्भात तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी मंडळ अधिकारी यांना दिनांक ३० ऑगस्ट रोजी संबंधित शेतकऱ्याचा अडवलेला रस्ता मोकळा करून देण्यासंदर्भात आदेश दिले होते. तसेच या प्रकरणात शेतकऱ्याने जर आढळून गेली तर त्यासाठी पिंपळनेर पोलीस ठाण्यालाही बंदोबस कामे मदत घेण्याची सूचना मंडळ अधिकाऱ्यांना देण्यात आली होती. हा रस्ता मोकळा करण्यासाठी तहसीलदार चंद्रकांत शेळके मंडळ अधिकारी श्रीमती विकणे यांच्यासह पिंपळनेर पोलीस ठाण्यातील कर्मचारी स्पॉटवर हजर होते. जेसीबीच्या साह्याने रस्ता मोकळा करून देण्यात आला आहे. गाडी रस्ता मोकळा करून दिल्याबद्दल संबंधित शेतकरी दत्तात्रय नरनाळे यांच्यासह परिसरातील शेतकऱ्यांनीही तहसीलदार चंद्रकांत शेळके श्रीमती विग्ने यांच्यासह महसूल कर्मचारी तथा पिंपळनेर पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांचे विशेष आभार मानले आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयात....

सुरेखा संभाजी वायबसे यांनी खोटे कागदपत्रे तयारी करून जमिनीचे फेरफार करून घेतले. या प्रकरणी रामहरी वायबसे यांनी संबंधितविरोधात गुन्हे दाखल देखिल केले आहेत. मात्र त्यांच्या विरोधात कारवाई होत नाही. संभाजी वायबसे, सुरेखा वायबसे, बाबुराव डोईफोडे ,लक्ष्मण वायबसे, दिपक डोईफोडे, सखाराम कदम या सहा लोकांविरोधात कारवाईची मागणी रामहरी वायबसे सतत करत आहेत. त्यांच्या या लोकांविरोधात कारवाई होत नसल्याने आज रामहरी वायबसे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये जावून खालच्या फ्लोअरमध्यें अंगावर पेट्रोल ओतून घेतल्याने एकच खळबळ उडाली होती. यावेळी त्यांची पत्नी देखिल त्यांच्या समवेत होती. पोलिसांनी रामहरी वायबसे यांना ताब्यात घेतले.दरम्यान वायबसे कुटूंबि १५ ऑगस्ट पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करत आहे.

## सावधान! कुठल्याही...

सरपंचांना तहसीलदारांनी सूचना दिल्या असून दवंडी देऊन गावातील लोकांना सतर्क राहण्याचे आवाहन तहसीलदार रुईकर यांनी केले आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## ठेवीदारांच्या ठेवी....

एस.एम.शेख, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, लातूर विभागचे फडणवीस सर, सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी बीड / माजलगावचे गौरव इंगोले, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीडचे सतीश तोतावार, जिल्हा सरकारी वकील धनंजय वाकनकर, अवसायक सर्व वित्तीय संस्थाचे आर.एम.तोटे, श्री. साई अर्बन मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.बीडचे व्यवस्थापक सचिन घोडके, ज्ञानराधा मल्टी स्टेट को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. बीडचे संपर्क अधिकारी गोपाळकृष्ण परदेशी, माँ जिजाऊ मल्टीस्टेट को-ऑप सोसायटी, बीडचे व्यवस्थापक सुरज जगदाळे यांची उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी एमपीआयडी संदर्भातील कामकाज गतीने होण्यासंदर्भात मा. जिल्हा मुख्य न्यायाधीश यांना पत्र देवुन सर्व कोर्टांची बैठक घेण्याबाबत विनंती करण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच ज्या प्रकरणामध्ये अधिसूचना प्रसिध्द झालेल्या नाहीत, त्या संदर्भात अपर मुख्य सचिव (गृह) यांना पत्र देवून अधिसूचना प्रसिध्द करुन सक्षम प्राधिकारी नेमणेबाबत विनंती करण्यात येणार आहे. सर्व अवसायक यांना त्यांची कार्यपध्दती निश्चित करणेबाबत सूचित करण्यात आले आहे. तसेच नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य यांना पत्र देवून मालमत्तांच्या मुल्यांकना संदर्भातील माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी एक नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यासाठी विनंती करण्यात आल्याचे सांगितले. तसेच या विषयावर पुढील बैठक एक महिन्यानंतर घेण्यात येणार असल्याचे ही यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सांगितले.

## गौरी महालक्ष्मी...

जपण्यासाठी टिपरे महोत्सवाचे भव्य आयोजन सन २०१९ पासून सुरु केले आहे. त्याला मिळणारा प्रचंड प्रतिसाद लक्षात घेऊन मागील दोन वर्षांपासून खास महिलांच्या आग्रही मागणीवरून भोलोबा (फेर) गीत स्पर्धा आणि गौरी महालक्ष्मी सजावट स्पर्धेचे आयोजन केले जात आहे. मागील वर्षी गौरी महालक्ष्मी सजावट स्पर्धेतील विजेत्यांना खेळ पैठणीचा या भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन करून त्यात बक्षिस वितरण केले होते. आ. विजयसिंह पंडित यांनी शारदा प्रतिष्ठान या सामाजिक, स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून आयोजित केलेल्या या उपक्रमांना गेवराई विधानसभा मतदार संघातील महिला भगिनींकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. यावर्षी आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली शारदा प्रतिष्ठान, गेवराई यांनी गौरी महालक्ष्मी सजावट स्पर्धेचे आयोजन केले आहे. स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम रु.१५ हजार, द्वितीय रु.११ हजार, तृतीय रु.७ हजार आणि उत्तेजनार्थ प्रत्येकी तीन विजेत्यांना रु.३ हजार रोख व सन्मानचिन्ह शहर आणि ग्रामीण अशा दोन्ही गटांसाठी दिले जाणार आहेत. अशा एकुण १२ विजेत्यांचा गौरव विशेष भव्य कार्यक्रमाचे आयोजन करून केला जाणार आहे. गौरी महालक्ष्मी स्पर्धेसाठी मोबाईल क्रमांक ७५८८६३५११२ आणि ९४२३७१४८४७ वर नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी केलेल्या स्पर्धकांनी गौरी महालक्ष्मी सजावटीचे तीन फोटो आणि किमान ६० सेकंद ते जास्तीत जास्त २ मिनिटांचा व्हिडीओ ७७१९९३३६३३ या मोबाईल क्रमांकावर व्हॉटस्प द्वारे पाठवावा. तज्ञ परिक्षकांकडून त्याचे गुणदान करण्यात येणार आहे. त्यामुळे गौरी महालक्ष्मीच्या आगमनापूर्वी लवकरात लवकर या स्पर्धेसाठी नोंदणी करण्याचे आवाहन राष्ट्रवादी महिला काँग्रेस पार्टीच्या तालुकाध्यक्षा सौ. मुक्ताताई आर्दड यांनी केले आहे.

## पिकांची व मालमत्तेची....

आत्महत्या असो अथवा शेतकऱ्यांच्या शेतातील नुकसान असो , त्यावर तात्काळ कार्यवाही झाली पाहिजे मदत मिळाली पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असतो . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक तसेच अंबाजोगाईच्या अपर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे - सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व तालुक्यांत प्रशासन सतर्क आहे . पावसाने झालेल्या नुकसानीची पाहणी करून शेतकऱ्यांना पिके वाचवण्यासाठी लागणाऱ्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन थेट संवाद साधला . त्यांनी दिलेल्या आश्वासनामुळे गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर एक दिलासा उमटला . गावातील शेतकरी व नागरिकांनी प्रशासनाकडून दाखवलेल्या संवेदनशीलतेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. पिचलेला पण न डगमगणारा बळीराजा : दरवर्षी वेगवेगळ्या रूपाने येणाऱ्या नैसर्गिक आपत्ती - दुष्काळ , गारपीट , अवकाळी पाऊस - यांनी बळीराजा अक्षरशः पिचला आहे . कर्जाचा डोंगर , पिकांवरचा खर्च आणि त्यातूनही पावसाचे खेळखंडोबामुळे त्याची स्वप्ने वारंवार चुरगळली जातात . तरीसुद्धा तो नव्याने धीर धरतो , पुन्हा उभा राहतो आणि नव्या पेरणीसह आशेची पालवी रुजवतो .

पाऊस कधी द्रोही तर कधी जीवनदाता ,कधी आशा तर कधी निराशेचा झरा . तरीही बळीराजा लढतो अखंड - कारण मातीतूनच त्याला उगम मिळतो नवा.

प्रशासनाचा तत्पर प्रतिसाद - आशेचा किरण : अशा परिस्थितीत तहसीलदार , तालुका कृषी अधिकारी व गटविकास अधिकारी हे तत्परतेने शेतकऱ्यांच्या दारी पोहोचतात , त्यांच्या व्यथा ऐकून घेतात , उपाययोजना सुचवतात , ही बाब निश्चितच उल्लेखनीय आहे . शासन व प्रशासनाचे हे पाऊल बळीराजाला केवळ मार्गदर्शनच देत नाही तर मानसिक धीरही देते . बीड जिल्ह्यात सरासरी ४७० मि.मी. पाऊस आतापर्यंत नोंदवला गेला असून तो हंगामाच्या ८३ टक्के इतका आहे . मागील वर्षी याच काळात ५५१ मि.मी. पावसाची नोंद झाली होती . केवळ मागील २४ तासांत शिरूर कासार येथे सर्वाधिक ८९ मि.मी. , अंबाजोगाईत ६५ मि.मी. , केजमध्ये ७१ मि.मी. , धारूरमध्ये ८३ मि.मी. आणि राजुरी , पाटोदा , आष्टी , गेवराई , माजलगाव , परळी आदी भागांत मुसळधार पावसाची नोंद झाली आहे . काही मंडळांमध्ये १०० मि.मी. पेक्षा जास्त पाऊसही झाल्याने अतिवृष्टीची नोंद घेण्यात आली आहे . ही माहिती बीड जिल्ह्याचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी दिली . यावेळी म्हाळसजवळाच्या मंडळ अधिकारी वंदना विघ्ने, ग्राम महसूल अधिकारी अक्षय डोफे , सामाजिक कार्यकर्ते दिनेश पवार तसेच बाळासाहेब राठोड , रामभाऊ पवार , सुरेश राठोड, सुनील राठोड , रमेश राठोड , विकास राठोड यांच्यासह गावातील अनेक शेतकरी उपस्थित होते . शेतकरी , प्रशासन आणि समाज या तिघांचे नाते परस्परावलंबी आहे . पावसाच्या संकटात अडकलेल्या शेतकऱ्याला फक्त आर्थिक मदतच नव्हे तर मानसिक आधार , वेळेवर सल्ला आणि साथ हवी असते . प्रशासनाने दाखवलेली संवेदनशीलता आणि शेतकऱ्यांनी दाखवलेला चिकाटीचा आत्मविश्वास - या दोन्हींचा संगम झाला तरच खरी शाश्वत शेती उभी राहू शकेल. या निमित्ताने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी प्रशांत वाघमारे यांनीही नागरिकांना आवाहन केले की , नदीकाठ, नाल्यालगत किंवा धोकादायक ठिकाणी जाऊ नये . हवामान खात्याच्या सूचना लक्षात घेऊन सुरक्षिततेची खबरदारी घ्यावी . प्रशासन सदैव सज्ज आहे , मात्र नागरिकांनीही स्वतःच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे .

## माटेगाव ग्रामपंचायतच्या...

सविस्तर चर्चा होऊन ठराव सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला. यावेळी सरपंच सौ शितल आरबड, उपसरपंच सौ. गिता शहादेव यादव, ज्ञानेश्वर आरबड, ग्रामसेवक पी.आर. घाडगे यांच्यासह सर्व ग्रामपंचात सदस्य उपस्थित होते. ग्रामपंचायतच्या वतीने दारुबंदी ठराव निवेदन चकलंबा पोलिस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक संदिप पाटील यांना देण्यात आले असून माटेगाव ग्रामपंचायतने घेतलेल्या निर्णयाचे परिसरात स्वागत केले जात आहे. यावेळी महादेव कर्डिले भागवत जंगले, योगेश गावडे, अजय टेकाळे, अभिजीत चव्हाण, अर्जुन घाडगे, हकिम शेख, सचिन जाधव दादासाहेब यादव, विक्रम गरुड, गोविंदराव चहाण, सुरेश कदम यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# राज्यातील यशस्वी खेळाडूंना दिलेले 22 कोटींचे रोख बक्षिस खेळाडूंच्या कष्टाला दिलेली दाद: उपमुख्यमंत्री अजित पवार

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील यशस्वी खेळाडूंना दिलेली २२ कोटींची रोख बक्षिसे ही त्यांच्या कष्टाला दिलेली खरी दाद आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले. राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून म्हाळुंगे बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुल गजबजून गेले होते. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने आयोजित या




सोहळ्यात आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील ३३१ विजेत्यांचा सन्मान करण्यात आला. या खेळाडूंना एकूण २२ कोटी ३१ लाख रुपयांची पारितोषिके देण्यात आली.

उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते १३ आंतरराष्ट्रीय व ३१८ राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना पारितोषिके देण्यात आली. सुवर्णपदक विजेत्यांना प्रत्येकी ७ लाख, रौप्यपदक विजेत्यांना ५ लाख आणि कांस्यपदक विजेत्यांना ३ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले. कार्यक्रमात मिशन लक्ष्यवेध हाय परफॉर्मन्स सेंटर या महत्वाकांक्षी योजनेच्या लोगोचे अनावरणही उपमुख्यमंत्री पवार आणि क्रीडा मंत्री ॲड. कोकाटे यांच्या हस्ते झाले.

या प्रसंगी ऑलिम्पिक पदक विजेता स्वप्नील कुसाळे, आमदार बाबाजी काळे, क्रीडा आयुक्त शीतल तेली-उगले, सहसंचालक सुधीर मोरे, माजी क्रीडा प्रशासक नामदेव शिरगांवकर, प्रशिक्षक संजय शेटे आदी मान्यवर उपस्थित होते. उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सलग दुसऱ्यांदा राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदकांचे द्विशतक झळकावले आहे, जे राज्याच्या क्रीडा परंपरेला अभिमानास्पद आहे. खेळाडूंच्या मेहनतीतून राज्याला मिळालेले यश हे १३ कोटी महाराष्ट्राच्या जनतेचे सामूहिक अभिमानाचे कारण आहे. खेलो इंडियासह इतर आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांनी केलेल्या ५८ कोटींच्या निधीच्या मागणीस तात्काळ मंजुरी दिली आहे. खेळाडूंना आवश्यक त्या सुविधा देऊन महाराष्ट्राने ऑलिम्पिकसह जागतिक स्तरावर वर्चस्व निर्माण करावे, हे आमचे ध्येय आहे, असे त्यांनी नमूद केले. त्यांनी पुढे सांगितले की, बालेवाडीतील शिवछत्रपती क्रीडा संकुलात देशातील पहिले ऑलिम्पिक संग्रहालय उभारण्याचा निर्णय घेतला आहे. हे संग्रहालय केवळ खेळाडूंच्या कामगिरीचा ऐतिहासिक दस्तऐवज नसून, नवीन पिढीला प्रेरणा देणारे व खेळात शिस्त, मूल्ये व संस्कार रुजवणारे केंद्र ठरणार आहे.

# नागरिकांनी श्री गणेशोत्सव मोठ्या आनंदात व शांततेत साजरा करा : तहसीलदार शेळके

**तहसीलदारांच्या हस्ते व भाजपा नेते नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांच्या हस्ते लोकशाही पत्रकार संघाच्या 'श्री' ची आरती मोठ्या उत्साहात आणि आनंदात श्री ची विधीवत महा पूजा करून झाली संपन्न.**



**बीड । प्रतिनिधी**

श्री गणेशोत्सव आनंदात आणि शांततेत साजरा करण्याची आपली हिंदू संस्कृती आहे त्या हिंदू संस्कृतीला अनुसरून बीड शहरासह तालुक्यातील नागरिकांनी श्री गौरी गणपती सण मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करावा असे आवाहन बीडचे दबंग कर्तव्यदक्ष तहसीलदार मा श्री चंद्रकांत शेळके साहेब यांनी लोकशाही पत्रकार संघाचा धानोरा रोडचा राजा गणेश मंडळाच्या वतीने येथे 'श्री' च्या आरतीच्या निमित्ताने केले.

तसेच देव, देश आणि धर्म या साठी आपण सर्वांनी मिळून सातत्याने आपले धार्मिक कार्य सामाजिक कार्य हे अतिशय उत्सुकतेने आपण सर्वांनी हे मिळून मिसळून काम आपले कर्तव्य म्हणून केले पाहिजे असे प्रतिपादन लोकशाही संघाच्या वतीने वतीने स्थापित करण्यात आलेल्या श्री गणेशाच्या आरती नंतर थोडक्यात अभ्यासपूर्वक आपले मनोगत व्यक्त करताना भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी या वेळी सांगितले. आरती नंतर तहसीलदार बीडची दबंग तहसीलदार मा श्री चंद्रकांत शेळके साहेब यांचा यथोचित सत्कार लोकशाही पत्रकार संघाचे मा संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य साहेब व बीड जिल्हाध्यक्ष मा श्री सहस जी आदोडे यांनी सत्कार केला. तर भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांचा सत्कार लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर व नितेश उपाध्ये यांनी केला.

# देशातील खेळाडू सशक्त बनावा यासाठी सार्वत्रिक काम करु : केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

देशाला २०४७ मध्ये विकसित राष्ट्र बनवायचं असेल, तर नागरिकांसोबत खेळाडूही सशक्त झाले पाहिजेत. देशातील खेळाडू सशक्त कसा बनेल यासाठी आपण सर्व मिळून काम करू, असे प्रतिपादन केंद्रीय क्रीडा आणि युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी केले. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर येथील भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्रात (एनसीओई) आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी माजी केंद्रीय राज्यमंत्री खासदार डॉ. भागवत कराड, साई केंद्राच्या उपसंचालक मोनिका



घुगे, सहायक संचालक सुमेश तरोडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

आजपासून भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्राला एनसीओई छत्रपती संभाजीनगर असे नाव मिळाले आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या नावामुळे हे केंद्र खेळाडूंना नवी ऊर्जा देईल, असे केंद्रीय राज्यमंत्री खडसे यांनी सांगितले. हॉकीचे जादूगार महान खेळाडू पद्मभूषण मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो. यावर्षीपासून देशभरातील शाळा-महाविद्यालयांमध्ये तीन दिवस विविध उपक्रम राबविले जाणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

नव्या क्रीडा धोरणातून खेळाडूंना गुणवत्तापूर्ण सुविधा, आधुनिक प्रशिक्षण आणि प्रोत्साहनपर वातावरण देण्यास केंद्र सरकार कटिबद्ध आहे. छत्रपती संभाजीनगरचे हे केंद्र राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचा गौरव करणारे खेळाडू घडवेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. कराड म्हणाले, महाराष्ट्रातील सर्वोत्तम क्रीडा केंद्रांपैकी असलेले साई केंद्र 'फिट इंडिया चळवळी'साठीही महत्वाची भूमिका बजावत आहे.



## के. एस. के. च्या द लास्ट बॅटल एकांकिकेची नाट्यपरिषद करंडक च्या अंतिम फेरीसाठी निवड

**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद करंडक या राज्यस्तरीय एकांकिकेत स्पर्धेतील प्राथमिक फेरीमध्ये, सौ.के. एस.के.महाविद्यालय बीड, नाट्यशास्त्र विभाग तर्फे डॉ. दीपाताई क्षीरसागर यांच्या प्रोत्साहनाने सादर झालेली द लास्ट बॅटल ह्या एकांकिकेची 'मुंबई येथे होणाऱ्या अंतिम फेरीसाठी' निवड झालेली आहे. या एकांकिकेला डॉ. दुष्यंता रामटेके यांचे मार्गदर्शन लाभले असून ; त्यांच्या संशोधक विद्यार्थ्यांनी हि एकांकिका सादर केली होती. संदीप पाटील लिखित या एकांकिकेचे दिग्दर्शन बाळू बटुळे, संगीत- पांडुरंग शिनगारे, रंगभूषा आणि वेशभूषा - कविता दिवेकर, संगिता बनकर नेपथ्य- केशव पाटील सौरभ मोरे, प्रकाशयोजना - बाळू बटुळे, डॉ. दुष्यंता यांनी केले असून साधना विटोरे, श्रुती गायकवाड,कनिष्क बनसोडे,भागेश दाभाडे,सुमित सोळुंके,एजाज सय्यद, स्वप्नील आव्हाड, आकाश गुंजाळ, आणि अशोक मगर इ. कलावंतांनी अभिनय केला. एकांकिकेचे उत्कृष्ट आणि दर्जेदार सादरीकरण झाले.



*भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांचा सत्कार करताना चंद्रकांत नाईक संभाजी भोसले गवते पाटील रमेश मातकर बाळासाहेब नाईक इत्यादी कार्यकर्ते हितचिंतक यावेळी छायाचित्र दिसत आहेत*

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे स्पर्धाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त दि. ३०/०८/२०२५ रोजी खुल्या वयोगटातील मॅराथॉन दौड मुले ५ कि.मी. व मुली ३ कि.मी. चे आयोजन च-हाटा फाटा ते च-हाटा रोड येथे करण्यात आले आहे. तसेच दुपारी १२.०० वा.के. पी.एस. विद्यालय, कालीका नगर, बीड येथे क्रीडा विषयक चर्चासत्राचे आयोजन, दुपारी ४ ते ६ च्या दरम्यान जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे तायक्कॉंदो, कराटे, फुटबॉल, स्केटींग खेळाच्या स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. ३१/०८/२०२५ रोजी सकाळी ८.०० वा. नागरीक सहभागातून संडे ऑन सायकल या सायकल रॅली चे पालवन चौक ते देवराई, पालवन येथे आयोजन करण्यात आले आहे. तसेच सकाळी ११.०० वा. जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे १७ वर्षाखालील मुलांच्या क्रीकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २९/०८/२०२५ रोजी जिल्हयातील सन २०२४-२५ या वर्षात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभागी झालेल्या व प्राविण्य मिळविलेल्या खेळाडूंचा सत्कार करण्यात येणार आहे. त्या करिता संबंधीत खेळाडूंनी स्पर्धेत सहभागी झालेल्या प्रमाणपत्राची व आधारकार्डची झेरॉक्स प्रत दि. २८/०८/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड येथे सादर करावीत अथवा dsobeed2442gmail.com या ई-मेल आयडीवर पाठवावीत. अधिकच्या माहिती करिता क्रीडा अधिकारी अनिकेत काळे (९६०४९५९६७८), कालिदास होसूरकर (९४२१५९५५१५), सतिष राठोड (९९२३०१९३५३), अविनाश पाटील (९६२३७८११२१), रेवननाथ शेलार (९०७५४७६७९१) जितेंद्र आराक (९२२६४८१७२८) यांना संपर्क साधवा असे जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर हे कळवितात.

# आजोबाच्या स्मृतिदिनी शिक्षक दिगांबर आर्दड यांनी दिली विद्यार्थी ग्रंथालयासाठी पाच हजार रुपयांची पुस्तके भेट!

**गेवराई । प्रतिनिधी**

शहरातील व तालुक्यातील श्रीपाद अंतर्वाला येथील मूळ रहिवासी असलेले शिक्षक श्री दिगांबर आर्दड सर यांनी आपले आजोबा कै. निवृत्ती लिंबाजी आर्दड यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून इतर विधीच्या होणाऱ्या व्यर्थ खर्चाला फाटा देऊन श्रीपाद आंतरवाला जिल्हा परिषद शाळेच्या बाल विद्यार्थी ग्रंथालयासाठी पाच हजार रुपये किंमतीच्या पुस्तकांचा संच भेट दिला. शाळेसाठी लागणारे शालेय पुस्तके भेट देऊन श्री दिगंबर आर्दड सर यांनी समाजासमोर एक नवीन आदर्श निर्माण केला.



त्यांच्याप्रमाणे प्रत्येक नागरिकांनी आपल्या परिसरातील शाळांना आवश्यक शालेय साहित्य देऊन विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भवितव्य घडविण्यासाठी हातभार लावला पाहिजे असे आवाहन आध्यात्मिक रत्न श्री. विजय महाराज आर्दड यांनी गेवराई तालुक्यातील अंतरवाला जिल्हा परिषद शाळेत पुस्तक वाटपाच्या कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना केले. या वेळी व्यासपीठावर श्री. हरिभाऊ निवृत्ती आर्दड, सरपंच उमेश आर्दड,शाळेचे मुख्याध्यापक श्री शेळके सर, ज्ञानोबा बापू आर्दड, आसाराम भाऊ आर्दड,अंकुशराव आर्दड, तूळसिदास भाऊ आर्दड, वैजिनाथ आर्दड, देवीदास जिजा आर्दड, नारायण वाकळे,मदन भाऊ आर्दड, मधुकर आर्दड, महादेव आर्दड, बंधू राजाभाऊ आर्दड, शाळेचे मुख्याध्यापक आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी श्री. हरिभाऊ निवृत्ती आर्दड, सरपंच उमेश आर्दड, ज्ञानोबा बापू आर्दड, आसाराम भाऊ आर्दड,अंकुशराव आर्दड, तूळसिदास भाऊ आर्दड, वैजिनाथ आर्दड, देवीदास जिजा आर्दड, नारायण वाकळे,मदन भाऊ आर्दड, मधुकर आर्दड, महादेव आर्दड, बंधू राजाभाऊ आर्दड, बालू तात्या आर्दड, परमेश्वर शितोळे, रघूनाथ शितोळे, बद्रीनाथ आर्दड, बप्पा आर्दड, जालिंदर वाकळे, माधव आर्दड, श्रीपाद आर्दड, अथर्व आर्दड यांच्यासह जेष्ठ नागरिक व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लिंबागणेश येथील अखंड हरिनाम सप्ताहाची शांतीब्रह्म तुकाराम महाराज भारती यांच्या काल्याच्या कीर्तनाने भक्तिमय सांगता

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपतीच्या पावनभूमीत भरविण्यात आलेल्या अखंड हरिनाम व गणेश नाम सप्ताह सोहळ्याची सांगता काल दि.२८ गुरुवारी झाली. सांगतेचा सोहळा महंत शांतीब्रह्म तुकाराम महाराज भारती, मठाधिपती श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान बेलगाव यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाला.

तुझिये संगती जाली आमुची निश्चिंती; नाही देखिले ते मिळे! भोग सुखाचे सोहळे! या जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या अभंगाच्या ओव्यांनी आणि



दाखल्यांनी मन हेलावणारे सुश्राव्य कीर्तन रंगले. संतसाहित्याचा आधार घेत भगवंताच्या सहवासाचे महत्त्व अधोरेखित करत भक्तांना अध्यात्मिक उन्नतीचा संदेश दिला.

दि.२१ ते २८ या सप्ताहकाळात भालचंद्र मंदिर सभामंडपात ह.भ.प. अक्षय महाराज पिंगळे (बीड), ह.भ.प. एकनाथ महाराज गाडे (चकलांबा), ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज कोटुळे (आळंदी देवाची), ह.भ.प. बबन महाराज मंझरीकर, ह.भ.प. गुरूवर्य सिमामाई धर्मराज महाराज पाटील (सामनगावकर), ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे (बंकट स्वामी संस्थान, नेकनुर), वैराग्यमूर्ती रामकृष्ण रंधवे (बापू, विठ्ठलगड पाटोदा) आदी नामवंत कीर्तनकारांनी विविध विषयांवर समाजप्रबोधन केले. सप्ताहभर हरिजागर, दुपारची प्रवचनसेवा आणि धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडले. सांगतेनिमित्त आयोजित काल्याच्या कीर्तनात ह.भ.प. महादेव भारती महाराज (बेलेश्वर संस्थान), गुरुवर्य धर्मराज दादा (सामनगाव), राजू लोखंडे (पाटोदा), खुळे महाराज (वैजाळा), शहादेव महाराज येडे (मोरगाव), विष्णू महाराज घरत (महाजनवाडी), गायक किशोर महाराज येडे,अशोक येडे (मृदंगाचार्य) यांनी उपस्थित राहून किर्तनात रंग भरला. सोहळ्यानंतर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.


## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती व्ही. व्ही. जोशी, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. १३५५/२०२५**

**गोवर्धन पि. रामराव उबाळे वि. जीवन पि. रामराव उबाळे**

अर्जदार- १.गोवर्धन पि. रामराव उबाळे, वय ६५ वर्षे, धंदा-शेती, रा.च-हाटा ता. जि. बीड, २. सरस्वती भ्र.तुकाराम तकीक, वय ७० वर्षे, धंदा-घरकाम, रा. अवलपुर ता. जि. बीड

विरुध्द

गैरअर्जदार - १. जीवन पि. रामराव उबाळे, वय ७० वर्षे, धंदा-शेती, रा.च-हाटा, ता. जि. बीड ह.मु. भक्ती कन्स्ट्रक्शन एकनाथ नगर, बीड ता. जि. बीड, २. बबन पि. रामराव उबाळे, वय ६० वर्षे, धंदा-शेती, रा.च-हाटा ता. जि. बीड ह.मु. जुनी भाजी मंडई, कबाड गल्ली, बीड ता.जि.बीड, ३. ताई भ्र.बापुराव दिवे, वय ६३ वर्षे, धंदा-घरकाम, रा. धानोरा ता. जि. बीड

**प्रकरण :- भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत कर रामराव पि.मारुती उबाळे व मयत क. २ देवुबाई भ्र. रामराव उबाळे, यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत क.१ रामराव पि. मारुती उबाळे, हे दिनांक २९/१०/२०१९ रोजी भक्ती कन्स्ट्रक्शन, एकनाथ नगर, बीड ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. मयत क. २ देवूबाई रामराव उबाळे, हया दिनांक ०९/०१/२०१८ रोजी भक्ती कन्स्ट्रक्शन एकनाथ नगर, बीड ता. जि. बीड येथे मयत झालेल्या आहेत. अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क. १ व २ हे दोन्ही मयताचे मुले असुन अर्जदार क. २ व गैरअर्जदार क. ३ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. अर्जदार व गैरअर्जदारांशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे मयत क. १ रामराव पि. मारुती उबाळे व मयत क. २ देवुबाई प्र. रामराव उबाळे, दोघे रा. भक्ती कन्स्ट्रक्शन एकनाथ नगर, बीड ता. जि. बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे देण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक २९/०८/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

**पुढील तारीख ०४/१०/२०२५.**

**(मार्फत- ॲड. नांदे एस.बी.)**

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) | शिक्का | (स्वाक्षरीत)
क.लिपीक | | अधिक्षक
| | दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शनिवार, दि. ३० ऑगस्ट २०२५ ● पान ४

# भरपावसात खा.बजरंग सोनवणे मनोज जरांगे यांच्या भेटीला

## मराठा आरक्षणला दिला जाहीर पाठिंबा ; पाठिंबा देणारे राज्यातील पहिले लोकप्रतिनिधी

बीड । प्रतिनिधी

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील आज आझाद मैदानावर उपोषणाला बसले आहेत. यावेळी भर पावसात खा.बजरंग सोनवणे यांनी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. यावेळी मराठा आरक्षण लढ्याला जाहीर पाठिंबा दिला. आपण दादासोबत आहोत, अशी प्रतिक्रिया देखील त्यांनी यावेळी माध्यमाना दिली.



मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मुंबईत मराठा आरक्षण आंदोलन सुरु झालं आहे. दोन दिवसांपासून राज्यातील मराठा आंदोलक मुंबईत दाखल झाले आहेत. दि.२९ रोजी आझाद मैदानात मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सुरू झाले आहे. दरम्यान सकाळ पासून जोरदार पाऊस सुरू आहे. परंतु पडत्या पावसात मराठा समाज रस्त्यावर आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी देखील पडत्या पावसात आझाद मैदानात जाऊन मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी जरांगे पाटील यांनी केलेल्या सर्व मागण्या सरकारने मान्य कराव्यात अशी मागणी देखील केली. खा.बजरंग सोनवणे यांनी सर्वात पहिली भेट दिली. बजरंग सोनवणे मैदानात येताच मराठा समाजाने त्यांचे प्रचंड जल्लोषात त्यांचे स्वागत केले. आंदोलनाला राज्यातील भेट देणारे पहिले लोकप्रतिनिधी ठरले आहेत. खासदार बजरंग सोनवणे यांनी उघड भूमिका घेतली असून जरांगे पाटील यांनी मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या सर्व मागण्या मान्य कराव्यात अशी मागणी केली

# ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी घेतला आढावा

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र ठेविदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ (एमपीआयडी ॲक्ट १९९९) अन्वये ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत श्री. जॉन्सन यांनी ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासंदर्भात संबंधीत विभागानी केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर आढावा घेतला.




यावेळी बैठकीस पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक एस.एस. शेजाळ, गुन्हे अन्वेषण विभाग (CID) छत्रपती संभाजीनगरचे पोलीस अधिक्षक यशवंत काळे, सहजिल्हा निबंधक वर्ग-२ बीडचे

▶ उर्वरित पान २ वर



*भाजपा बीड जिल्हा सरचिटणीस पदी गणेश लांडे यांची निवड झाल्याबद्दल त्यांनी माननीय माजी खासदार प्रीतम ताई मुंडे यांचे आभार मानून सत्कार केला याप्रसंगी उपस्थित बीड तालुका सरचिटणीस महादेव नागरगोजे, महादेव वारे उपसरपंच हनुमान पांगरी.*

# गौरी महालक्ष्मी सजावट स्पर्धेत सहभागी व्हा

## गेवराई राष्ट्रवादीच्या सौ. मुक्ताताई आर्दड यांचे आवाहन

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांनी सालाबादाप्रमाणे याहीवर्षी गौरी महालक्ष्मी सजावट स्पर्धेचे आयोजन केले आहे. गेवराई शहर आणि ग्रामीण अशा दोन गटांत ही स्पर्धा गेवराई विधानसभा मतदार संघातील महिला भगिनींसाठी आयोजित केली आहे. गौरी महालक्ष्मी सजावट स्पर्धेतील



विजेत्यांना प्रथम रु.१५ हजार, द्वितीय रु.११ हजार, तृतीय रु.७ हजार आणि उत्तेजनार्थ प्रत्येकी तीन विजेत्यांना रु.३ हजार रोख व सन्मानचिन्ह शहर आणि ग्रामीण अशा दोन्ही गटांसाठी दिले जाणार आहेत. इच्छुक स्पर्धकांनी दि.३१ ऑगस्टपूर्वी नोंदणी करण्याचे आवाहन गेवराई तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या तालुकाध्यक्षा सौ. मुक्ताताई आर्दड-मोटे यांनी केले आहे. गेवराई विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांनी गेवराई शहराच्या पारंपारीक लोककलेचा वारसा

▶ उर्वरित पान २ वर

# पिकांची व मालमत्तेची काळजी घ्या : प्रशासन सदैव तुमच्या पाठीशी आहे – तहसीलदार चंद्रकांत शेळके

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात सध्या सतत कोसळणारा पाऊस , त्यातून उभ्या शेतपिकांचे होणारे नुकसान आणि त्यामध्ये चिंतेत सापडलेला शेतकरी . अशीच परिस्थिती अंथरवन पिंपरी तांड्यासह अनेक भागात पाहायला मिळत आहे . शुक्रवार , २९ ऑगस्ट रोजी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके , गटविकास अधिकारी अशोक राठोड आणि तालुका कृषी अधिकारी अशोक साळी यांनी या



गावाला भेट देऊन शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला .

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे नैसर्गिक आपत्तीच्या बाबतीत अत्यन्त संवेदनशील आहेत . शेतकरी

▶ उर्वरित पान २ वर



# बीड जिल्हा फुटबॉल असोसिएशन बीड २०२५ फूटबॉल साखळी स्पर्धेत ८ संघांनी नोंदवला सहभाग

## स्टेडियमवर भर पावसात दोन्ही टिम जीव तोडून खेळल्या ; पॅनॉल्टीवर बुलंद एफ. सी. टिमने सामना जिंकला

बीड । प्रतिनिधी

जिल्हा फुटबॉल असोसिएशनच्या वतीने फुटबॉल लिग २०२५ स्पर्धा गेल्या ५ दिवसांपासुन येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा संकुलाच्या मैदानावर सुरू होत्या. एकुण ८ संघांनी यामध्ये सहभाग नोंदवला होता. त्यापैकी बीड येथील मिलन बॉईज आणि बुलंद एफ.सी.या दोन टिम फायनलमध्ये पोहचल्या. बुधवारी स्टेडीयमवर भर पावसात मिलन बॉईज विरूध्द बुलंद एफ. सी. या दोन टिममध्ये झालेल्या अंतिम सामन्यात दोन्ही टिम जीव तोडून खेळल्या मात्र पॅनॉल्टीवर बुलंद एफ. सी. टिमने फुटबॉल चषकावर आपले नाव कोरत विजेता ठरण्याचा मान मिळविला तर मिलन यॉईज टिम उपविजेता ठरली.

# मधुकर लोखंडे यांचे निधन

आष्टी । प्रतिनिधी

कासारी मुर्शदपुरचे माजी सरपंच आणि सेवानिवृत्त एस.टी. बस चालक, मधुकर सर्जेराव लोखंडे (वय ६९) यांचे अहिल्यानगर येथील एका रुग्णालयात उपचारादरम्यान दुःखद निधन झाले. आठ दिवसांपूर्वी आष्टी शहरात झालेल्या एका मोटारसायकल अपघातात ते गंभीर जखमी झाले होते. त्यांच्या निधनाने आष्टी शहरावर शोककळा पसरली आहे.

# माटेगाव ग्रामपंचायतच्या वतीने दारुबंदीसाठी चकलांबा पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांना निवेदन दिले

### सरपंच सौ शितल आरबड यांनी घेतला पुढाकार

उमापुर । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील मौजे माटेगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. शितल ज्ञानेश्वर आरबड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत माटेगाव येथे दारु विक्री व दारुबंदी करण्यात आली आहे. दरम्यान ग्रामपंचायतने घेतलेल्या निर्णयाचे



परिसरात स्वागत करण्यात येत आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, माटेगाव येथे जि.प.शाळा, मंदिर व बसस्थानक परिसरात अवैध दारू विक्रीमुळे लोक व्यसनाधीन होऊन सार्वजनिक शांतता भंग होत असुन शाळेतील मुला-मुलींना व महिलांना त्रास होत असल्यामुळे दारुबंदीसाठी सरपंच सौ. शितल ज्ञानेश्वर आरबड यांनी पुढाकार घेतला. दिनांक २२ फेब्रुवारी रोजी सरपंच सौ. शितल आरबड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ग्रामसभेत दारुबंदीचा ठराव घेण्यात आला. यावेळी शरद आश्राजी शिंदे यांनी सभेत विषय मांडला की, मौजे माटेगाव मध्ये व परिसरात अवैध दारू विक्री गावातील शाळा, मंदिर व बसस्थानक या परीसरात होत असल्यामुळे शाळेतील मुला मुलींना व गावातील महिलांना यामुळे त्रास होत आहे. तसेच अवैध दारू विक्री व मद्यपानामुळे लोक व्यसनाधीन होऊन गावामध्ये खालील समस्या निर्माण झाल्या आहेत आहेत. गावातील अवैध दारू विक्री कायमची बंद झाल्यास मद्यपाणामुळे होणारे दुष्परिणाम टाळता येतील. यावर उपस्थित सरपंच, उपसरपंच व सर्व ग्रामस्थ यांच्यात

▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात...

### इतर मागासवर्गातील विद्यार्थ्यांना वसतीगृहासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु

बीड । प्रतिनिधी

इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी वसतीगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दीनदयाळ उप्याधाय स्वयम योजनेंतर्गत प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रकाबाबत. शैक्षणिक सन २०२५-२६ करिता इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुला/मुलींसाठी शासकीय वसतीगृहामध्ये प्रवेशासाठी`पश्नळपश अर्ज प्रक्रीया सुरु झाली आहे, त्यानुसार इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या मुला-मुलींच्या वसतीगृहामध्ये प्रवेश घेता येणार आहे. तसेच ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडीत दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेअंतर्गत १२ वी नंतर च्या व्यावसाईक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या विध्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. वरीलप्रमाणे शासनाच्या https://hmas.mahait.org या ऑनलाईन पोर्टलवर १२ वी नंतरच्या व्यावसाईक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी (बिगरव्यावसाईक अभ्यासक्रम वगळून) दि. १ ते १८ सप्टेंबर, २०२५ रोजी पर्यंत अर्ज भरण्यासाठी मुदत दिलेली आहे. तरी जिल्ह्यातील इमाव.विमाप्र. विजाभज विद्यार्थ्यांनी वसतीगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडीत दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. अधिक माहितीकरिता इतर मागास बहुजन कल्याण मुला-मुलींचे शासकीय वसतीगृह बीड येथील गृहपाल तसेच सहाय्यक संचालक कार्यालयाशी संपर्क साधावा.

### ३१ ऑगस्ट रोजी 'भटके विमुक्त दिवस' म्हणून साजरा करावा

बीड । प्रतिनिधी

इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत शासन निर्णयान्वये ३१ ऑगस्ट हा दिवस राज्यात 'भटके विमुक्त दिवस' म्हणुन साजरा करणे व त्यादिवशी विविध उपक्रम राबविणेबाबत शासनाने निर्देशित केलेले आहे. त्याअनुषंगाने ३१ ऑगस्ट हा 'दिवस भटके विमुक्त दिवस' जिल्हास्तरावर साजरा करण्यात येणार आहे. दि.३१ ऑगस्ट, २०२५ रोजी इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, बीड यांच्यामार्फत भटक्या विमुक्त संस्कृतीचे जिवनमुल्य, परिसंवाद शासकीय योजनांची माहीती, आरोग्य शिबीर, जात वैधता प्रमाणपत्र वाटप, प्रेरणादायी व्यक्तींचे सत्कार इत्यादी कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. यावेळी कार्यक्रमास जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, व इतर प्रशासकीय अधिकारी तसेच प्रमुख पाहुण्यांची उपस्थिती असणार आहे. तरी भटके विमुक्त संघटना यांचे पदाधिकारी, विमुक्त भटके समाजातील बांधवांनी शासकीय विश्राम गृहासमोर, सामाजिक न्याय भवन बीड, येथे दि. ३१ ऑगस्ट, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थित रहाण्याचे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण सहायक संचालक डी.बी. क्षीरसागर यांनी प्रसध्दिपत्रकाद्वारे केले आहे.

### पिंपळनेर मध्ये भटक्या कुत्र्यांचा नागरिकांना त्रास

पिंपळनेर । प्रतिनिधी

ग्रामीण भागात दिवसेंदिवस झपाट्याने वाढणारी भटक्या कुत्र्यांची संख्या नागरिकांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. या कुत्र्यांकडून नागरिकांना चावा घेण्याच्या घटना वाढू लागल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. बीड तालुक्यातील पिंपळनेर सह परिसरातील वाड्या-वस्त्यांवर भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. काही ठिकाणी पाळीव कुत्र्यांना नागरिक रस्त्यावर सोडून देतात, तर काही भटकंती करणारी कुत्री कायम गावात फिरताना दिसत आहेत. अशा कुत्र्यांमुळे नागरिकांना चावा घेण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. काहीवेळा आजारी पडलेली किंवा पिसाळलेली कुत्री जनावरांनाही इजा पोहचवत आहेत. कुत्रा हा पाळीव प्राणी गावाच्या सुरक्षेसाठी उपयुक्त ठरतो. मात्र, लसीकरण आणि नसबंदी न झाल्याने भटक्या कुत्र्यांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासन, पशुवैद्यकीय विभाग आणि पशुप्रेमी यांनी पुढाकार घेतल्यास या समस्येवर उपाय निघू शकतो, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.

### दि. १७ सप्टेंबर २०२५ रोजी किडनी विकार तपासणी शिबिर

बीड । प्रतिनिधी

जैन सोशल फेडरेशन अहमदनगर संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल, बीड (जालना रोड, शाहू बँकेजवळ) येथे बुधवार, दि. १७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११:०० ते दुपारी २:०० वाजेपर्यंत किडनी विकार तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. किडनीच्या आजारांमध्ये सतत वाढ होत असून, आजार ओळखण्यात झालेला उशीर हा अनेक वेळा रुग्णांसाठी जीवघेणा ठरतो. ग्रामीण व शहरी भागातील अनेक रुग्ण वेळेत योग्य तपासणी व तज्ज्ञांचा सल्ला घेऊ शकत नाहीत. या पार्श्वभूमीवर हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

### ढोल, ताशा आणि हलगी वादकांना आले अच्छे दिन

पिंपळनेर । प्रतिनिधी

पिंपळनेरसह परिसरात गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सवात खेळल्या जाणाऱ्या लेझिमसाठी लागणाऱ्या ढोल ताशा आणि हलग्यांना आता अच्छे दिन येत आहेत. पंधरा दिवसांच्या संपूर्ण पॅकेजसाठी मंडळांना लाख रुपये मोजावे लागत आहेत. डीजेच्या या जमान्यात पिंपळनेरात शेकडो वादकांसाठी ही पर्वणी ठरत आहे. गाव व शहरात गणेशोत्सव म्हटले की, महिनाभर आधीच ढोल, ताशा आणि हलगीचा दणदणाट सुरू होतो. गणेशोत्सवात शेकडो मंडळे मिरवणुका काढतात. या मिरवणुकांमध्ये ढोल ताशांच्या निनादात लेझीमचा जोशपूर्ण खेळ मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळतो. लहानग्यांपासून ते वयोवृद्धांपर्यंत आणि तरुण-तरुणीपर्यंत सर्वजण उत्साहाने लेझीम खेळताना दिसतात. सध्या गावात व शहरात ढोल-ताशा आणि हलगी वादक पथकांना प्रचंड मागणी आहे. गणेशोत्सवासाठी अनेक मंडळांनी महिनाभरापूर्वीच या पथकांचे बुकिंग केले आहे. गणेशोत्सवापाठोपाठ येणाऱ्या नवरात्र आणि धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या मिरवणुकांसाठीही आतापासूनच बुकिंग करण्यात येत आहे. त्यामुळे ढोल, ताशा आणि हलगी वादक कलाकारांसाठी खऱ्या अर्थाने अच्छे दिन आले आहेत, असे म्हणावे लागेल.